# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ७४७/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. प्रमोद भागचंदानी,<br>फ्लॅट नं. २०२, पार्वती टॉवर, इंदोरा चौक,<br>नागपूर-४४००१७ | कनिष्ठ लघुलेखक, दादा रामचंद बाखरु सिंधू महाविद्यालय, पांचपावली, नागपूर-१७ | कार्यकारी प्राचार्य, दादा रामचंद बाखरु सिंधू महाविद्यालय, पांचपावली, नागपूर-१७ |

**सुनावणी दिनांक :- ११.११.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ११.०३.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १४.०३.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अचुक प्रतिसाद मिळाला नाही.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : उपलब्ध नाही

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : Provide me Appointment Documents of Dr. Mukesh Kaushik in Handicapped Category provide me all complete Documents of his appointment along with handicapped certificate by collage. How many staff is working at Non-Grant I want complete list of salary slips, adhar card, provident fund and salary sheet along with their appointment letter at collage provide me expenditure details of function held at collage period mention above. I need information personally. I am ready to pay all charges. I will inspect the documents will ask Xerox. I need information for law & jury department & acb Nagpur.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (म.वि.वि.) (अति.प्र.) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांनी दिनांक १८.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी, दादा रामचंद्र बाखरु सिंधु महाविद्यालय, पांचपावली रोड, नागपूर यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लघुलेखक, दादा रामचंद्र बाखरु सिंधू महाविद्यालय, नागपूर यांनी दिनांक ०३.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळण्याकरीता आपल्या नातेवाईकांनी सुध्दा आमच्या संस्थेअंतर्गत शाळेत अर्ज सादर केलेला होता. त्या प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयात रिट याचिका (W.P. No. २१६/२०१९& W.P. No. ६५१९/२०१९) दाखल करण्यात आली असून मा. उच्च न्यायालयात सदर याचिका अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. सदर याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाचे अंतिम निर्णय येई पर्यंत आम्ही आपल्या वरील संदर्भीय अर्जावर विचार करु शकत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०७.०२.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांनी दिनांक २८.०१.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ०२.०३.२०२२ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३.०१.२०२२ रोजी दिलेले उत्तर योग्य दिसून येते. त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे, असे आदेश पारीत केले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —** आज अपिलार्थी श्री. प्रमोद भागचंदानी हे आयोगासमोर व्यक्तीशः हजर असून त्यांनी सदर प्रकरण निकाली काढण्याची विनंती केलेली आहे.

**६. निष्कर्ष —**

अपिलार्थी यांनी आयोगासमोर केलेल्या विनंतीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.११.२०२४**

जावक क्रमांक ---48--- दिनांक --- 17 JAN 2025 ---